# प्रेसनोट

दि.१३/०८/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.७३३/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सुभाष यादवराव वाबळे, वय—५६ वर्ष, धंदा—नोकरी, दप्तर कारकून, वर्ग—३, कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,५००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे वडीलांचे नावे मौजे बोरी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथे शेत जमिनीचे क्षेत्र आहे. त्यातील एक हेक्टर क्षेत्रासाठी धनगरवाडी जलाशय येथून पाणी उपसा करण्याची परवानगी मिळण्याबाबतचा अर्ज कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा यांच्याकडे केला होता. सदर परवानगी प्राप्त करुन दिल्याच्या मोबदल्यात आरोपी लोकसेवक सुभाष यादवराव वाबळे, दप्तर कारकून, वर्ग—३, कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांच्याकडे २०००/— रुपये लाचेची मागणी केली होती. याबाबतची तक्रार ला.प्र.वि. अहमदनगर कार्यालयास प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.१२/८/२०२३ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान यातील आरोपी लोकसेवक सुभाष यादवराव वाबळे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती १५००/— रुपये लाचेची मागणी करुन ती लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक वाबळे यांचेविरुध्द श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर